नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/११/२०२५ (सोमवार )**

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन उमरेड आणि भिवापूर हद्‌दीतील मतदान केंद्र,एस.एस.टी पॉईन्ट तसेच स्ट्रॉंग रूम ( Strong room ) येथे दिली भेट

आगामी नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आज दिनांक १७/११/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन उमरेड आणि भिवापुर हद्दीतील मतदान केंद्र, एसएसटी (स्टॅटिक सर्व्हेलन्स टीम) पॉईंटला, तसेच स्ट्रॉंग रूम ( Strong room ) येथे भेट दिली. मा. पोलीस अधिक्षकांनी दोन्ही पोलीस स्टेशन हद्दीतील जास्त गर्दीचे मतदान केंद्राना भेट दिली तसेच उमरेड येथील नुतन आदर्श महाविदयालय, स्ट्रॉंग रूम, भिवापुर तहसिल कार्यालय, स्ट्रॉंग रूम , गंगापुर एसएसटी, गिरड रोड, एसएसटी आणि भिवापुर, एसएसटी पॉन्ईटला भेट दिली. मा पोलीस अधिक्षकांनी स्वत: मतदान केंद्रांची पाहणी करून मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या उपाययोजना तपासून घेतल्या. एसएसटी टीमच्या सदस्यांना सतर्क राहण्याच्या तसेच एसएसटी टीमने बेकायदेशीर हालचालींवर सर्तकतेने नजर ठेवावी आणि त्वरित कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच दोन्ही स्ट्रॉंग रूम चे सी.सी.टी.व्ही कॅमरे तसेच इतर सुरक्षा उपाययोजना तापासुन संबधीतांना योग्य सुचना दिल्या.

सदर भेटी दरम्यान मा.श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या सह श्रीमती वृष्टी जैन, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड, तसेच संबधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हजर होते.


NATIONAL SERVICE SCHEME





## कळमेश्वर फेटरी येथील जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या जळीत ट्रक प्रकरणात अजुन १ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :—दिनांक १६/११/२५ रोजी पाहटे फेटरी येथे नागपुर ते काटोल रोडवर एक टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक एम एच ४० सी.डी ५०९४ याचा टायर फुटल्यानंतर सुध्दा नमुद चालक आरोपी याने दुघर्टना होवु शकते हे माहीती असतांना सुध्दा सदर वाहन न थांबविता चालवित राहील्याने रोडचे आणि टायरचे घर्षण झाल्याने आग लागली होती. सदर वाहनात एकुण २९ जनावरे मृत पावली होती तसेच ८ गोवंश जनावरे जिवंत मिळुन आले होते. नमुद प्रकरणी दिनांक १६/११/२०२५ रोजी गुन्हा नोंदवुन आरोपी क्र १) वाहन मालक नामे मोहम्मद नासिर मोहम्मद शफी कुरेशी ,वय ४१ वर्षे ,रा. खापा ता सावनेर ,ह.मु बुर्ज खलीफा होटल जवळ, महेंद्र नगर, टेका नाका, नागपुर आरोपी क्रं २) वाहन चालक नामे सय्यद उर्फ सोनु सुलतान हमीद अली, वय ३२ वर्षे,रा प्लॉट क्र २३८ आके ले आउट ,आजरी माजरी,यशोधरा नगर, नागपुर आणि क्रं ३) क्लिनर आरोपी नामे अमीर रहुफ कुरेशी, वय २९ वर्षे,रा महेंद्र नगर, पाण्याचे टाकी जवळ, पाचपावली नागपुर यांना यांना ताब्यात घेतले होते. **त्यानंतर रात्री पोलीसांनी सदर प्रकरणात अजुन एक आरोपी क्रं** ४) **जनावरे**

**वाहनात चढविणारा तसेच गुन्हयात मदत करणारा आरोपी रफीक कुरेशी शेख सत्तर कुरेशी, वय ३२ वर्ष, रा. टेका नाका पाण्याच्या टाकीजवळ नागपुर याला सुध्दा टेका नाका परीसारातुन ताब्यात घेतले. नमुद चारही आरोपीतांना अटक केली असुन. मा न्यायालयालने नमुद आरोपीतांचा दिनांक २०/११/२०२५ रोजी पर्यंत ४ दिवसांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे. सदर प्रकरणाचा तपास कळमेश्वर पोलीस करीत आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री,वाहतुक तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २३ गुन्हे नोंद.

**दिनांक १६/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, दुचाकी वाहन तसेच ईतर साहीत्य असा एकुण २,७०,० १०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे २ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे २ गुन्हे नोंद आह. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन वेलतुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २३ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ३४११० मिली देशी दारू, १७२५ लीटर मोहाफुल दारू , ४००लिटर सडवा, एक दुचाकी वाहन तसेच ईतर साहीत्य असा एकुण २,७०,०१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक १६/११/२०२५ रोजी देवलपार पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मोरफाटा दर्गा शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १).मोहम्मद रिजवान मो. इकबाल अहमद, वय ४४ वर्षे, २).मोहम्मद सलीम मो.शफि अन्सारी, ४९ वर्षे,३).मोहम्मद बब्बु मो. अफजल अन्सारी,वय ५१ वर्षे, ४).मोहम्मद जाकीर हुसेन मो.कादर खान, वय ५२ वर्षे, ५). मोहम्मद मोबीन मो सिद्दीकी अन्सारी, ५०वर्षे, ६).मोहम्मद मुक्तार मो. समसु अन्सारी, ४९ वर्षे,सर्व रा. नागपुर,हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.

**आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते ,रोख रक्कम २१००/— रूपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने